CNR NO.MHSO060002142026

**नियमित दिवाणी दावा क्र.२२/२०२६**

रावसाहेब वगरे

**विरुध्द**

महाराष्ट्र शासन, वगैरे

**निशाणी क्र.३५ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींनी वादपत्र खारीज करण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे दाखल केलेला आहे. प्रतिवादींच्या अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :–

०२. प्रतिवादींचे कथन आहे की, वादीने प्रतिवादी क्र.७ व ८ यांचे हक्कातील तीन खरेदीखत रद्दबातल असल्याचे जाहीर करुन मागितलेले आहे. तथापि, दाव्याची आकारणी कोणत्या कायद्यातील तरतूदीनुसार रक्कम रु.१,०००/– केली व त्यास किती रुपयांचा मुद्रांक दिला आहे हे नमुद केले नाही. खरेदीखत रद्दबातल करुन मागावयाचे झाल्यास खरेदीखताच्या किंमतीनुसार आवश्यक मुद्रांक देणे गरजेचे आहे. तथापि, वादीने केवळ रु.१,०००/– अशी दाव्याची आकारणी केलेली आहे. करिता, दावा कायद्याने चालु शकत नाही, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे वादपत्र खारिज करण्यात यावे.

०३. वादीने त्यांचे म्हणणे (निशाणी क्र.४२) दाखल केले. वादीने कथन केले की, वादीने खरेदीखत रद्द करुन मागितलेले नाही केवळ खरेदीखते ही पोकळ व बेकायदेशीर आहेत असे जाहीर होवुन मिळण्याची विनंती केलेली आहे. त्यामुळे सदरच्या अर्जात तथ्य नाही. दाव्यास योग्य तो मुद्रांक दिलेला आहे. सर्व बाबी तपासुन दावा नोंदलेला आहे. करिता, प्रतिवादींचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा.

०४.       दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादींतर्फे न्यायालयीन शुल्काबाबत युक्तिवाद करण्यात आला. त्यानंतर वादीने तीनही खरेदीखताबाबत दाव्याची आकारणी करुन मुद्रांक शुल्क देणेबाबत दाव्यात दुरुस्ती केलेली आहे. त्यामुळे मुद्रांक शुल्काबाबत आक्षेप आता उपस्थित होत नाही. प्रतिवादींनी दाव्यास रेस ज्युडिकेटा या तत्वाची तसेच भूसंपादन कायद्यातील तरतुदींची बाधा येत असल्याचा युक्तिवाद केला. तथापि, युक्तिवाद करत असलेल्या बाबीबाबत प्रतिवादींच्या अर्जात काहीही कथन नाही. त्यामुळे सदरील युक्तिवाद हा विचारात घेता येवु शकत नाही.

०५.       प्रतिवादीने मा. सर्वोच्च न्यायालयाच्या *१) द चर्च ऑफ ख्रिस्त चॅरिटेबल ट्रस्ट ॲन्ड एज्युकेशनल चॅरिटेबल सोसायटी वि. मे. पोन्नीम्मन एज्युकेशनल ट्रस्ट, सिव्हील अपील क्र.४८४१/२०१२ २) टी.अरिवंदनदम वि. टी. व्ही. सत्यपाल आणि इतर, दि.१४ ऑक्टोबर, १९७७, इक्वीव्हॅलेंट १९७७ एआयआर २४२१, ३) राजस्थान हौसिंग बोर्ड आणि इतर वि. चांदी बाई आणि इतर, सिव्हील अपील क्र.११९१२/२०१८* तसेच मा. उच्च न्यायालयाचे ***चेअरमन, नागपूर इम्प्रुव्हमेंट ट्रस्ट, नागपुर वि. महाराष्ट्र शासन, वगैरे, सिव्हील रिव्हीजन अर्ज क्र.४९/२०२३*** या न्यायनिर्णयांचा आधार घेतला.

०६.       प्रतिवादींतर्फे दाखल न्यायनिर्णय विचारात घेण्यात आले. सदरील न्यायनिर्णय हे भूसंपादन कायद्यातील तरतुद पाहता तसेच दाव्यास कारण नसेल तर वादपत्र खारिज होण्यास पात्र ठरते या संदर्भात आहेत. प्रतिवादींचे अर्जात भूसंपादन अथवा दाव्यास कारण नसल्याबाबतचे कथन नाही. त्यामुळे वादीस सदरील बाबीवर म्हणणे देता आलेले नाही. करिता, सदरील युक्तिवाद विचारात घेण्यात येत नाही.

०७.       दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे एखादे वादपत्र जर

कमी आकारणी दाखवुन तसेच अपुरे मुद्रांक शुल्क देवुन दाखल केले असेल व न्यायालयाने वादीस दाव्याची योग्य ती आकारणी करुन योग्य ते मुद्रांक शुल्क देण्याचा आदेश केला असेल व वादी विहित कालावधीत त्या आदेशाचे पालन करत नसेल तर रद्द करणे आवश्यक आहे. वादीने दाव्यात दुरुस्ती करुन दाव्याची आकारणी केलेली आहे. त्या अनुषंगाने मुद्रांक शुल्क देखील दिलेले आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. करिता, खालील आदेश.

## आदेश

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

(खुल्या न्यायालयात घोषीत.)

स्वाक्षरीत/-

दि.१८.०३.२०२६

( नीलेश सु. बुद्रुक )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
पंढरपूर

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file are same word to word as per the original.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Suresh M. Malkapalli |
| (b) | Court | : | Jt. Civil Judge (S.D.), Pandharpur. |
| (c) | Signed by P.O. On | : | 23.03.2026 |
| (d) | Uploaded on | : | 24.03.2026 |